# वसई विरार शहर महानगरपालिका

## विद्युत विभाग, मुख्यालय, विरार (पुर्व)

### निविदा सुचना क्र.२ (२०२१-२२)

वसई विरार शहर महानगरपालिका विद्युत विभागाकडील खालील उल्लेखित कामाकरिता शासनाचे विद्युत विभागाकडील योग्य त्या वर्गात नोंदणीकृत ठेकेदाराकडुन बी-१ नमुन्यात व्दिलखोटा पध्दतीनुसार महानगरपालिकेच्या अटी व शर्तांस अधिन राहुन मोहरबंद निविदा मागविण्यात येत आहे. सदर कामाचे कोरे निविदा फॉर्म दि. ०३ /०३/२०२१ ते दि. १९ /०३/२०२१ पर्यंत दुपारी ३.०० वाजेपर्यंत सुटटीचे दिवसाखेरीज महानगरपालिकेच्या कार्यालयीन कामकाजाच वेळेत रोखीने विकत मिळतील. सदर कामाचा इसारा रक्कम आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका या नावे देय असलेल्या डिमांड ड्राफट व्दारे भरावी लागेल व सदर डिमांड ड्राफट निविदेसोबत जोडावा लागेल. डिमांड ड्राफ्ट इसारा न भरलेल्या, खाडाखोड केलेल्या, मुदतीत न आलेल्या व सशर्त निविदा नाकारण्यात येतील. सदर कामी पुर्ण भरलेल्या मोहरबंद निविदा दि.२४ /०३/२०२१ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत महानगरपालिकेच्या विद्युत विभाग, मुख्यालय, विरार पुर्व येथे देण्यात यावेत. प्राप्त निविदा या उप-आयुक्त (विद्युत) यांचे दालनात हजर निविदाधारक अथवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी यांचे समक्ष निविदा समोर शक्यतो त्याच दिवशी दुपारी ४.०१ वा. अथवा इतर सोयीच्या दिवशी प्रथम तांत्रिक बोलीचा लिफाफा क्र.१ उघडण्यात येईल. लिफाफा क्र.१ मध्ये सविस्तर निविदा सुचनेमध्ये दर्शविल्याप्रमाणे कागदपत्रे असल्यास वित्तीय बोलीचा लिफाफा क्र. २ उघडण्यात येईल. याकामी आलेल्या निविदांपैकी कोणतीही एक निविदा स्विकारण्याचा अथवा आलेल्या सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार महानगरपालिकेने राखुन ठेवला आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजपत्राकिय रक्कम | इसारा रक्कम | सुरक्षा अनामत | निविदा फॉर्म फी (१८% GST करासहीत) | कामाची मुदत | निविदा प्रकार |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील वैतरणा ब्रिज (बहाडोली) सिग्नल यंत्राणेस इन्व्हर्टर व बॅटरी बसविणे. | ९९,५६३/- | १०००/- | २% डी.डी. ने व २% बिलातुन | २००/- + १८% GST एकुण २३६/- | १ महिने (३० दिवस) | बी-१ |

**अटी शर्ती**

१) कोरे निविदा फॉर्मची मागणी करतेवेळी अर्जासोबत सार्वजनिक बांधकाम (विद्युत) विभागाच्या नोंदणी प्रमाणपत्राची छायांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.

२) ज्या ठेकेदाराचे नावे कामाचे नोंदणी प्रमाणपत्रक आहे त्यांनी मुळ कागदपत्रांसह स्वत:अगर अधिकृत प्रतिनिधी मार्फत कोरे निविदा फॉर्म घेऊन जाणे आवश्यक आहे.

३) निविदाबाबत अधिक माहितीसाठी विद्युत विभाग, मुख्यालय येथे संपर्क साधावा.

४) लिफाफा क्र.१ मध्ये खालील कागदपत्रांच्या छायांकित प्रतीचा सामावेश असणे आवश्यक आहे.
**(अ) सार्वजनिक बांधकाम विभागाकडील** (विद्युत) **योग्य त्या वर्गातील नोंदणी प्रमाणपत्राची प्रत, (ब) GST नोंदणी प्रमाणपत्र, (क) इसारा रक्कमेचा डिमांड ड्राफ्ट, (ड) रु. १०० स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र (सोबत जोडलेले परिशिष्ठ "अ" नमुन्यानुसार) (ई) रु. ५०० स्टॅम्प पेपरवर घोषणापत्र (सोबत जोडलेले परिशिष्ठ "ब" नमुन्यानुसार)**. सदर कागदपत्रे लिफाफा क्र.१ मध्ये नसल्यास संबंधित निविदा धारकास अपात्र ठरविण्यात येईल व फक्त पात्र निविदाधारकांच्या स्पर्धात्मक निविदांचा बोलिचा लिफाफा क्र.२ उघडण्यात येईल.

Scanned with CamScanner

अम

५) अंदाजपत्रकिय रक्कमेपेक्षा कमी किंमतीचा देकार सादर करणाऱ्या निविदा धारकांनी लिफाफा क्र.१ व लिफाफा क्र.२ उघडल्यानंतर प्रथम न्युनतम देकार करणाऱ्या L-१ निविदाकाराने "Additional Performance Security Deposit" आठ दिवसाच्या आत संबंधित विभाग अभियंता यांचेकडे डि.डि. जमा करावा. ही आठ दिवसांची मुदत कोणत्याही कारणासाठी शिथीलक्षम असणार नाही.

६) प्रथम न्युनतम देकाराच्या (L-१) निविदाकाराने वरील विहित मुदतीत "Additional Performance Security Deposit" चा भरणा केला नाही तर व्दितीय न्युनमत देकाराच्या (L-२) निविदाकारास लेखी विचारणा करण्यात येईल व (L-२) निविदाकार (L-१) पेक्षा कमी दराने काम करण्यास तयार असतील तर त्यांची निविदा मंजुर करण्यात येईल.

७) अंदाजपत्रकिय रक्कमेपेक्षा कमी किंमतीचा देकार असल्यास इसारा रक्कमे बरोबर अतिरिक्त जमा करावा लागणारे परफॉमन्स सिक्युरिटी पुढील प्रमाणे.
अ) १% ते १०% पर्यंत कमी दराचा देकार-परफॉमन्स सिक्युरिटी १%,
ब) १०% ते १५% पर्यंत कमी दराचा देकार- प्रत्येक टक्क्यास अतिरिक्त १%,
क) १५% पर्यंत कमी दराचा देकार- प्रत्येक टक्क्यास अतिरिक्त १%,
(उदा. १९% कमी दरासाठी पुढील प्रमाणे पृथ:करण :- १०% कमी दरापर्यंत १% व १५% कमी दरापर्यंत (१५%-१०%=५%) तसेच (१९%-१५%=४%) करीता (४% x २%=८%) असे एकुण (१%+५%+८%=१४%)

८) मुदतीत प्राप्त झालेल्या निविदा शक्यतो त्याच दिवशी दु.४ वाजुन ०१ मी. अथवा दुसऱ्या दिवशी उपस्थित निविदाकार / त्यांचे प्रतिनिधी यांचे समक्ष उघडण्यात येतील.

९) कोणतीही एक निविदा स्विकारण्याचा किंवा आलेल्या सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार मा.आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका यांनी राखुन ठेवला आहे.

१०) इतर सविस्तर अटी-शर्ती निविदा फॉर्ममध्ये नमूद करण्यात आल्या आहेत.

जा.क्र:- वाविशम/साप्रावि/६३८/२०२१
दिनांक :- ०२/०३/२१

(शंकर खंदारे)
उप-आयुक्त (विद्युत)
वसई विरार शहर महानगरपालिका

Scanned with CamScanner